# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in


अतितात्काळ क्र.: तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१५/633

कालमर्यादित दिनांक : - 2 MAR 2015

प्रति,

प्राचार्य/संचालक,

______________________

______________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:— **शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मध्ये प्राप्त झालेल्या ईबीसी रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३—१४ ची ईबीसीची रक्कम या विभागातील सर्व संस्थांना अदा करण्यात आली आहे. ईबीसीची रक्कम आपल्या संस्थेस अदा झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधीत विद्यार्थ्यांना अदा करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व रक्कम अदा केल्याबाबतची संबंधीत विद्यार्थ्यांची पावती या कार्यालयास जमा करणे आवश्यक असते व न केल्यास प्रतीदिन १% याप्रमाणे दंड आकारण्याबाबत शासनाने कळविलेले आहे. त्यानुसार या कार्यालयाव्दारे निर्गमित केलेल्या आदेशामध्येसुध्दा आपणास कळविलेले आहे.

तरी अद्यापर्यंत ब—याच संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१३—१४ ची ईबीसीची रक्कम वाटपाचे उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयात सादर केलेली नाही. या पत्राव्दारे आपणास सुचित करण्यात येते की ज्या संस्थेने अद्यापर्यंत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांनी **दि. ०४/०३/२०१५ पर्यंत या कार्यालयास** जमा करावे अन्यथा आपणाकडून संपूर्ण रक्कमेच्या प्रतीदिन १% याप्रमाणे दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात येईल याबाबत गंभिर नोंद घेण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

D:\EBC\EBC-2013-14 Main Folder\EBC General Letter.doc